वाचले :-१) मुंबई प्रांतिक महानगरपालिका, अधिनियम १९४९ मधील कलम ५४/१

२) महाराष्ट्र महानगरपालिका (दुसरी सुधारणा)अधिनियम २०११मधील प्रकरण ३ मधील सुधारीत तरतुदी.

३) मा.आयुक्तमो.यांचे कडील आदेश क्र.प्रशा/२/कावि/४४७/२०१५,दि२०/१०/२०१५

४) सामान्य प्रशासन विभाग यांचेकडील परिपत्रक क्र.बीसीसी-२०१७/प्र/क्र.३१२ व दि.२९.डिसेंबर-२०१७

५) महाराष्ट्र शासन यांचेकडील संकीर्ण -२०१६/प्र.क्र.३२०/टीनीटी -१ दि.०४ – डिसेंबर -२०१८

६) पदोन्नती निवड समिती सभा दिनांक १३/०१/२०२०

७) मा.अतिरिक्त आयुक्त यांचेकडील दि.०१/०२/२०२० रोजीचा मान्य प्रस्ताव.

---

पिंपरी-चिंचवड महानगरपालिका
माध्यमिक शिक्षण विभाग
माध्य/शि/०१/कावि/१०३/२०२०
दि. ०१/०२/२०२०

विषय – 'मुख्याध्यापक' या पदावर पदोन्नतीबाबत..........

आदेश,

पिंपरी-चिंचवड महानगरपालिका,माध्यमिक शिक्षण विभागाचे आस्थापनेवर "मुख्याध्यापक" या अभिनामाची १८ पदे र.रु. ९३००-३४८०० ग्रेड वेतन-४८०० या वेतनश्रेणीमध्ये शासन मंजुर असून या संवर्गामध्ये रिक्त असणारी खुल्या प्रवर्गातील श्रीम.भोले इंदिरा शंकरराव मुख्याध्यापक ह्या दि.३१/०१/२०२० रोजी नियतवयोमानानुसार सेवानिवृत्त होत असल्याने त्यांच्या जागेवर खुल्या प्रर्वगातुन सेवाजेष्ठतेनुसार श्रीम.पानसरे सुजाता संजय यांना मुख्याध्यापक या पदावर पदोन्नतीने देणेकामी दि.१३/०१/२०२० रोजी पदोन्नती समितीने मान्यता देण्यात आलेली आहे.

सदरच्या समितीने पदोन्नती आरक्षण रद्द करण्यासंदर्भात सामान्य प्रशासन विभागाकडील पत्र दि.२९ डिसेंबर २०१७ आणि दि.११ ऑक्टोबर २०१८ अन्वयेचे निर्देश विचारात घेता पदोन्नतीपुर्व सहा.शिक्षक पदावरील कर्मचा-यांची शैक्षणिक पात्रता, अनुभव कालावधी, आरक्षण गोपनीय अहवाल, सेवाजेष्ठता क्रमांक, इत्यादी सेवविषयक तपशील पडताळुन रिक्त असणा-या पदावर खालील सहा.शिक्षक पदावरील कर्मचा-यांना मुख्याध्यापक या पदावर पे बॅंड ९३००-३४८०० ग्रेड पे- ४८००/- या वेतनश्रेणीमध्ये मा.सर्वोच्च न्यायालयात प्रलबिंत असलेली विशेष अनुज्ञा याचिका क्र. २८३०६/२०१७ च्या अंतिम निर्णयाच्या अधिन राहून निव्वळ तात्पुरत्या स्वरूपात सेवाजेष्ठतेनुसार खुल्या प्रवर्गातुन पदोन्नतीने नेमणूक देण्यास शिफारस केली आहे.

| अ.क्र. | नाव | प्रवर्ग | पदोन्नतीने दिलेले विद्यालय |
|---|---|---|---|
| १ | श्रीम.पानसरे सुजाता संजय | खुला(अनु.जाती) | माध्यमिक विद्यालय फुगेवाडी |

सबब, उपरोक्त नमुद केलेल्या बाबी विचारात घेता मी अतिरिक्त आयुक्त, पिंपरी-चिंचवड महानगरपालिका. पिंपरी १८ मला वाचले क्र.३ अन्वये प्रदान करण्यात आलेल्या अधिकाराचा वापर करुन उपरोक्त नमुद कर्मचा-यांना मागासवर्ग पदोन्नतीचे आरक्षण रद्द करण्यासंदर्भात सामान्य प्रशासन विभागाकडील पत्र दि.२९ डिसेंबर -२०१७ आणि दि.११ ऑक्टोबर २०१८ अन्वयेचे निर्देशानुसार पथमत: ०१ वर्ष परिविक्षाधिन कालावधीकरीता निव्वळ तात्पुरत्या स्वरूपात सेवाजेष्ठतेनुसार खुल्या प्रवर्गातुन मुख्याध्यापक पदावर पे बॅंड रू ९३००-३४८०० ग्रेड पे – ४८०० या वेतनश्रेणीमध्ये पदोन्नती देण्यास प्रस्तुतच्या आदेशान्वये मान्यता देत आहे. तसेच त्यांच्या नावासमोर दर्शविलेल्या विद्यालयामध्ये पदोन्नतीने पदस्थापना देण्यात येत आहे.

उपरोक्त प्रमाणे देण्यात येत असलेली पदोन्नती ही मुख्याध्यापक या पदाच्या बिंदु नामावली व आरक्षण मागासवर्गीय कक्ष विभागीय आयुक्त कार्यालय, पुणे यांच्याकडुन अद्ययावत करून घेण्याच्या अधिन असेल.

Scanned by CamScanner

उपरोक्त कर्मचा-यांना निसंदिग्धपणे समज देणेत येते की त्यांना प्रस्तुतच्या आदेशान्वये देण्यात आलेली पदोन्नती ०१ वर्ष परिविक्षाधिन कालावधीकरीता तात्पुरत्या स्वरूपाची असुन या कालावधीत त्यांची हजेरी वर्तवणूक कामकाज इत्यादी बाबी विचारात घेऊन त्यांना देण्यात आलेली पदोन्नती नियमित करणे अथवा पदावनत करणे याबाबतचा निर्णय घेण्यात येईल.उपरोक्त नमुद केलेल्या कर्मचा-यांना मुख्याध्यापक या पदावर र. रु. ९३००-३४८०० ग्रेड वेतन-४८०० या वेतनश्रेणीमध्ये आदेशाच्या दिनांकापासुन खालील अटींचे अधिन राहुन पदोन्नतीने नेमणुक देण्यास मान्यता देत आहे.या संदर्भात पदोन्नतीचे लाभ पुर्वलक्षी प्रभावाने मागता येणार नाही.

अटी-

५) सदरची पदोन्नती ही प्रथमत: १ वर्ष परिविक्षाधिन कालावधीकरिता (Probation period) पुर्णत: हंगामी स्वरुपात राहील. परिविक्षाधिन कालावधीत कामकाज हजेरी, वर्तणुक असमाधानकार वाटल्यास कोणतीही पुर्वसुचना न देता पदोन्नतीपुर्व सहाय्यक शिक्षक या पदावर पदावनत करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

६) सदर पदोन्नती आपण सादर केलेल्या कागदपत्रांच्या आधारे दिलेली असुन, त्यात तफावत आढळल्यास अथवा प्रकरण न्यायप्रविष्ठ झाल्यास सदरची पदोन्नती रद्द करण्यात येईल.

प्रस्तुत आदेशाची नोंद संबंधिताचे सेवानोंद पुस्तकात घेणेत यावी.

सही/-
अतिरिक्त आयुक्त (१)
पिंपरी-चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी-१८

प्रति
१)श्रीम.पानसरे सुजाता संजय (सहा.शिक्षिका)
प्रत- २) लेखा विभाग, ३)मुख्यलेखा परिक्षक
४)प्रशासन विभाग, कर्मचारी वैयक्तीक नोंदणी कक्ष, संगणक कक्ष(प्रशासन), मागासवर्गीय कक्ष,
५)माध्यमिक विभाग टेबल क्र. २ व ४
६)माध्यमिक विद्यालय -------------
२- पुढील कार्यवाहीसाठी

शिक्षणाधिकारी
माध्यमिक शिक्षण विभाग
पिंपरी-चिंचवड महानगरपालिका
पिंपरी पुणे १८

Scanned by CamScanner